RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष ११, अंक ९२] शुक्रवार, नोव्हेंबर १४, २०२५/कार्तिक २३, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक २०२**

**प्राधिकृत प्रकाशन**

### कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) अन्वये

**सूचना**

क्र. कडोंमपा/ नरवि/३६७७.—ज्याअर्थी, कल्याण डोंबिवली महानगरपालिका (यापुढे जिचा उल्लेख " उक्त महानगरपालिका" असा करण्यात आला आहे) हद्दीतील कल्याण व अंबरनाथ तालुक्यातील २७ गावांकरिता विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) चे कलम ३१ (१) मधील तरतुदीनुसार शासन नगरविकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीएस- १२१२/१६९७ /प्र.क्र. १०१ / १३ /नवि-१२, दिनांक ११ मार्च,२०१५ अन्वये सारभूत स्वरूपाचे फेरबदल (EP) वगळून मंजूर केलेली आहे. तसेच शासन नगरविकास विभागाची अधिूसचना क्र. टिपीएस-१२१६/१६९७/प्र.क्र. २०४/१६/नवि-१२, दिनांक ९ मे, २०१७ अन्वये सारभूत स्वरूपाचे फेरबदल (EP) वगळलेल्या भागास मंजुरी प्रदान केलेली आहे. तसेच उक्त महानगरपालिकेच्या सेक्टर क्र. ३ ते ७ ची विकास योजना शासन नगरविकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीएस / १२०८/२८८४ /सी. आर. १३९/०९/नवि–१२, दिनांक ४ एप्रिल,२०१२ अन्वये सारभूत स्वरूपाचे फेरबदल (EP) वगळून मंजुर करण्यात आली आहे. तसेच सारभूत स्वरूपाचे फेरबदल (EP) शासन अधिसूचना क्र. टिपीएस् १२१२/४५८ / प्र.क्र.१४८/१२/नवि-१२, दिनांक ४ ऑगस्ट, २०१६ नुसार शासनाने मंजूर केलेले आहेत (जिचा उल्लेख यापुढे "उक्त मंजूर विकास योजना" असा करण्यात आला आहे.) ;

आणि ज्याअर्थी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त प्राधिकरण" असा करण्यात आला आहे) मार्फत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचा उक्त मंजूर विकास योजनेमधील मौजे हेदुटणे येथील स.नं. ९४ ते मौजे टिटवाळा येथील स.नं. १२२ पर्यंत ३०.०० मी. व ४५.०० मी. रुंद विकास योजना रस्त्याचे (यापुढे ज्याचा उल्लेख "रिंगरुट" असा करण्यात आला आहे) काम Segment - I ते VIII असे टप्प्यामध्ये करण्यात येत आहे. तसेच उक्त मंजूर विकास योजनेच्या २७ गावांमधील मौजे भोपर येथील स.नं. २४३ (सोबत जोडलेल्या नकाशानुसार) H Point पासून ते सेक्टर ५ मधील मौजे आयरे येथील स.नं. १८ पर्यंत (H१ ) ३०.०० मी. रुंद विकास योजना रस्ता जोडलेला नाही (यापुढे ज्याचा उल्लेख "Missing Link" असा करण्यात आला आहे.)

आणि ज्याअर्थी, उक्त प्राधिकरणाने दिनांक १५ ऑक्टोबर,२०२४ रोजी झालेल्या त्यांच्या कार्यालयातील बैठकीमध्ये उक्त Missing Link बाबत Segment - II मधील ३०.०० मी. रुंद रिंगरुटची नवी रुपरेषा करीता 'अ' आणि 'ब' या पर्यायांपैकी 'ब' पर्याय अंतिम करण्यात आला असून त्याअनुषंगाने पर्याय 'ब' च्या रुपरेषेनुसार नवीन ३०.०० मी. रुंद रस्त्याच्या रुपरेषेची सुरुवात ( H१ ) मौजे भोपर, ता. कल्याण येथील स.नं. २४३ (पै), २२(पै), २१(पै), २४५ (पै), ११(पै), २१७ (पै), ८(पै), १० (पै), ९ (पै), २१६ (पै), ३(पै), ४(पै), २१३(पै), १११(पै), ११० (पै), २५२ (पै), ११७(पै), २६१(पै), २६२(पै), १७९(पै), १८६ (पै), १९५(पै), १९४(पै), १९८ (पै), १९९ (पै), २०१(पै), मौजे नांदीवली तर्फे पंचानंद मधील स.नं. ८६ (पै), ५४ (पै), ५३(पै), मौजे कोपर येथील स.नं. ११ (पै), १० (पै), १९ (पै), १८(पै), १७(पै), १६ (पै), २० (पै), तसेच मौजे जुनी डोंबिवली येथील ५३ (पै), ५५ (पै), ५७ (पै), ६० (पै), ६१(पै), ६९(पै), ६८(पै), ५६(पै) पर्यंत रिंगरुट Segment - III च्या सुरुवातीच्या भागातील ३०.०० मी. रुंद रस्त्यापर्यंत अंतिम करण्यात आली आहे. सदर नवीन प्रस्तावित Missing Link च्या रुपरेषेमुळे उक्त मंजूर विकास योजनेतील २७ गावांमधील मौजे भोपर येथील आ.क्र. जी - १६, एकूण क्षेत्र ४५८००.०० चौ.मी. हे भागशः बाधीत होत आहे. सदर जी - १६ आरक्षणाच्या एकूण क्षेत्रापैकी अंदाजे स.नं. २१(पै), २४५(पै), २२(पै), एकूण क्षेत्र ३०७५.०० चौ.मी. आरक्षणाचे क्षेत्र कमी होणार आहे व अंदाजे ४२७२५.०० चौ. मी. जी - १६ या आरक्षणाचे क्षेत्र शिल्लक राहणार आहे ( यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त फेरबदल" असा करण्यात आला आहे. ) ;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेमध्ये उक्त अधिनियमाचे कलम ३७ ( १ ) अन्वये उक्त फेरबदलाची कार्यवाही करण्यास उक्त महानगरपालिकेच्या मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी प्रशासकीय ठराव क्र. २८५, दिनांक ३ नोव्हेंबर, २०२५ रोजी मान्यता दिली आहे.

आणि त्याअर्थी, उक्त फेरबदल दर्शविणारा २७ गावे व सेक्टर ५ चा भाग नकाशा खालील ठिकाणी कार्यालयीन दिवशी कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहे.

१ ) सहाय्यक संचालक, नगररचना, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण (प.).

२ ) १० / ई प्रभागक्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, दावडी, डोंबिवली (पूर्व).

३ ) ८ / ह प्रभागक्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, डोंबिवली (प.).

उक्त फेरबदल प्रस्तावास ज्या नागरिकांना हरकत व / आणि सूचना असतील त्यांनी विहित स्वरूपात त्यांचे म्हणणे ही सूचना **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून तीस ( ३० ) दिवसांच्या आत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या सचिव कार्यालयामध्ये सादर करण्यात याव्या, जेणेकरून सदर फेरबदलाचा प्रस्ताव शासन मंजुरीस सादर करण्यापूर्वी त्यावर विचार करता येईल.

कल्याण,
दिनांक ६ नोव्हेंबर, २०२५.

**सं. ना. डोईफोडे,**
सहाय्यक संचालक, नगररचना,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.

## KALYAN DOMBIVALI MUNICIPAL CORPORATION, KALYAN

[(As per Section 37(1) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966)]

### *Notice*

क्र. कडोमपा / नरवि/३६७७.—Whereas, the Development plan for 27 villages of Kalyan and Ambernath Talukas situated in Kalyan Dombivali Municipal Corporation (hereinafter referred to as " the said Corporation") has been sanctioned by the Urban Development Department, Government of Maharashtra under section 31(*1*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as the said Act") *vide* notification No. TPS- 1212/1697/C.R.101/13/UD-12, dated 11th March 2015 excluding the excluded parts (EP) and sanctioned the Excluded part of the said Development Plan *vide* Urban Development Department notification No. TPS-1216/1697/C.R.240/16/UD-12, dated 9th May 2017. Also the Development plan for Sector 3 to 7 for the said Corporation has been sanctioned by the Urban Development Department, Government of Maharashtra as per section 31(*1*) of the said Act *vide* notification No. TPS- 1208/2884/C.R.139/09/UD-12, dated 4th April 2012 excluding the excluded parts (EP) and sanctioned the Excluded part of the said Development Plan *vide* Urban Development Department notification No. TPS-1216/458/C.R.148/12/UD-12, dated 4th August 2016 (hereinafter referred to as "the said sanctioned Development Plan") ;

And Whereas, Mumbai Metropolitan Region Development Authority (hereinafter referred to as the "said Authority") is developing the development plan road of the said Corporation having width 30.00mt and 45.00mt starting from Survey number 94 at village Hedutane to survey number 122 at village Titwala (hereinafter referred to as "the Ring Route") in parts namely Segment I to VIII. As per the said sanctioned Development Plan, there is no connectivity for 30.00mt wide road from survey number 243 at village Bhopar (H point) to survey number 18 at village Ayare (H1 point) (hereinafter referred to as "Missing Link") ;

And Whereas, the said Authority has finalized alignment option B for the said Missing Link in Segment II of the said Ring Route provided from option A and B during the meeting conducted in their office dated 15th October 2024. The proposed 30.00mt wide alignment starts from survey number 243 (P) at village Bhopar and passes through survey number 22(P), 21(P), 245(P), 11(P), 217(P), 8(P), 10(P), 9(P), 216(P), 3(P), 4(P), 213(P), 111(P), 110(P), 252(P), 117(P), 261(P), 262(P), 179(P), 186(P), 195(P), 194(P), 198(P), 199(P), 201(P) and thereafter passes through village Nandivali tarfe Panchanand having survey numbers 86(P), 54(P), 53(P) village Kopar having survey number 11(P), 10(P), 19(P), 18(P), 17(P), 16(P), 20(P), village Dombivali (Old) having survey numbers 53(P), 55(P), 57(P), 60(P), 61(P), 69(P), 68(P), 56(P) and it ends at the beginning of 30.00mt wide Segment III Ring Route. Due to the proposed new alignment of Missing Link, the area of Reservation No. G-16 having total area of 45800.00 sq.mt is being approximately reduced by 3075.00sq.mt. The area of reservation of G-16 is reduced at Survey Number 21(P), 22(P) and 245(P) at village Bhopar. The revised area of reservation No.G-16 will approximately be 42725.00sq.mt. (hereinafter referred to as "the said Modification") ;

And Whereas, the commissioner cum administrator of the said cum administrator of the said Corporation *vide* General Resolution No.285, dated 3rd November, 2025 has approved to carry out the said modification in the said sanctioned Development Plan as per section 37(*1*) of the said Act.

Now therefore, the plan depicting the said modifications has been kept for inspection during office time and official days at following locations.

1) Assistant Director of Town Planning, Kalyan Dombivali Municipal Corporation, Kalyan (W.).

2) 10/E Ward Office, Kalyan Dombivali Municipal Corporation, At Village Davdi, Dombivali (E.).

3) 8/H Ward Office, Kalyan Dombivali Municipal Corporation, Dombivali (W.).

I hereby invite all citizens to raise suggestions and/or objections if any for the said modifications and the same shall be communicated to the office of the Secretary, Kalyan Dombivali Municipal Corporation within 30 days from the date of publication of this notice in *Gazette of Government of Maharashtra,* so that the received suggestion And/Or objection may be taken into consideration before submitting the said modification to State Government for final approval.

Kalyan,
Dated 6th November 2025.

S. N. DOIFODE,
Assistant Director of Town Planning,
Kalyan-Dombivali Municipal Corporation.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.